
दिपा मेहताचा जुना चित्रपट नव्या नावाने



१९९०मध्ये दिपा मेहताने *वॉटर* नावाच्या चित्रपटाची सुरुवात केली होती. पण त्यावरून बराच गदारोळ माजल्यावर तिने तो अर्ध्यातच बंद केला. असं ऐकलंय की, दिपा मेहता तोच चित्रपट *रिव्हर मून* या नावाने पुन्हा पडद्यावर आणतेय. मूळ चित्रपटात राहूल खन्ना होता. त्याच्या जागी जॉन अब्राहमला घेण्यात आलं. सलग चाळीस दिवसांच्या तारखा देऊ शकत नसल्याचं कारण पुढे करून करिनाने मात्र हा प्रस्ताव नाकारलाय.

भारतीय निर्माता-दिग्दर्शकांचं धाडस

निर्माता-दिग्दर्शक अभिक भानू याचा *सब कुछ है कुछ भी नहीं* हा पहिलाच चित्रपट प्रदर्शनाधिन आहे. बातमी अशी की, आयबीएच नावाच्या एका जर्मन प्रॉडक्शन कंपनीशी चित्रपट निर्मितीसाठी हातमिळवणी केलेली आहे. ही जर्मन कंपनी अभिकच्या कंपनीबरोबर सहनिर्माती म्हणून या क्षेत्रात उतरेल. याची घोषणा नुकतीच जर्मनमध्ये करण्यात आली. भारतीय निर्मात्याबरोबर जर्मन कंपनीचं टाय अप होण्याची ही पहिलीच घटना आहे. एका मल्टीनॅशनल कंपनीच्या धोरणाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या एका तरुणीची ही कथा आहे.



*सब कुछ है कुछ भी नहीं*ची टीमः किर्ती, सचित, अभिक भानू आणि पूजा

चित्रलेखा ते रेडियो

स्व. हरींद्र दवे यांची गुजराती चित्रलेखात नियमित प्रसारित होणारी 'मुखवटे' ही कादंबरी नाट्यरूपांतर होऊन आता दर बुधवारी संध्याकाळी ६.४५ वाजता प्रसारित करण्यात येते. या कादंबरीचं नाट्यरूपांतरण पत्रकार समीर पालेजा यांनी केलं असून ती वैशाली त्रिवेदी यांनी सादर केली आहे.

झी सिनेमाचा नवा प्रयोग

'आ गया सिनेमा' या योजनेअंतर्गत झी सिनेमाच्या मुव्ही चॅनलने आपल्या देशातील काही विशिष्ट भागात तसंच ग्रामीण भागात व्हॅनच्या द्वारे झीचे चित्रपट दाखवण्याची योजना आखली आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, हरियाणा, पंजाब, उत्तरांचल, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेशसारख्या राज्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. रोज संध्याकाळी लोकांना रात्री ८.३०वाजता निश्चित स्थळी एकत्र येण्याविषयी आवाहन केलं जातं. अर्थात, लोकांचा प्रतिसाद किती मिळतो ते पाहून ही योजना किती काळ राबवायची ते ठरवलं जाईल.

शेमारूची आगेकूच

शेमारूच्या शो रूममध्ये ७५०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांचे कॅटलॉग्स उपलब्ध आहेत. अलिकडेच संजय गुप्ताच्या *प्लान* चित्रपटाच्या व्हीसीडी-डीव्हीडी शेमारूने बाजारात आणल्यात. इतकंच नाही तर हॉलीवूडच्या लोकप्रिय चित्रपटांच्या व्हीसीडी-डीव्हीडीजही बाजारात आणण्याचा त्यांचा विचार आहे. यासाठी हम्फी बोगार्ट-केथरीन हेपबर्न अभिनित, चार ऑस्कर पुरस्कारांसाठी नॉमिनेटेड असलेल्या *द आफ्रिकन क्वीन*ची निवड त्यांनी केली आहे.

एचएमव्हीच्या मास्टर इब्राहिमना श्रद्धांजली

मास्टर इब्राहिम यांनी वयाच्या १९व्या वर्षी रणजीत स्टुडियोमध्ये एक वादक म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली. ते क्लेरिनेट वादनात निष्णात होते. १९४२मध्ये त्यांनी एमएमव्हीत नोकरी धरली. १९४५ ते १९७० या कालावधीत एचएमव्हीने सुमारे २५० रेकॉर्ड्स ७८ आरपीएममध्ये मास्टर इब्राहिम यांच्या नावाने बाजारात आणल्या. भारतीय चित्रपट संगीतात क्लेरिनेटचा वापर करण्याचं श्रेय मास्टर इब्राहिम यांना जातं. त्यांची क्लेरिनेटवर गाजलेली गीतं- 'प्यार किया तो डरना क्या...'(*मुगल-ए-आझम*), 'आ जा रे परदेसी...'(*मधुमती*), 'नैन मिले चैन कहा...'(*बसंत बहार*), 'दिल का खिलौना...'(*गुंज उठी शहनाई*), 'तू प्यार का सागर है...'(*सीमा*), 'वो देखो जला घर किसीका...'(*अनपढ*) वगैरे.



मास्टर इब्राहिम

या गुणी कलाकाराला श्रद्धांजली म्हणून त्यांनी वाजवलेल्या सोळा मधूर गीतांचा संग्रह ऑडियो कॅसेट आणि सीडीच्या रूपात *मेलो गोल्ड* या नावाने एचएमव्हीने बाजारत आणलाय.



हिरो होन्डाच्या वर्ल्ड सिरीजच्या *सारेगामापा*च्या अंतिम फेरीत महारथींची हजेरीः (डावीकडून) शान, जगजित-चित्रा सिंग, गुलाम अली, ओ. पी. नय्यर, आबिदा परवीन आणि एम. एम. करीम